# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

डॉ. शाकेरा इनामदार
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
कार्यक्रम समन्वयक

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१
मोबाईल : ९८२२ ७० ७० ६१


संदर्भ : रासेयो/७९७/२०१३

दि.२७ जूलै २०१३

प्रति,
मा. प्राचार्य/जिल्हा/विभाग समन्वयक
जिल्हा/विभाग समन्वयक महाविद्यालये
पुणे, अहमद नगर, नाशिक

**विषय : राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय सेमीनार – जिल्हा/विभाग समन्वयक उपस्थित राहणे बाबत...**

मा. महोदय,

मा. सहायक कार्यक्रम सल्लागार, रासेयो क्षेत्रिय कार्यालय, पुणे यांनी कळविलेल्या पत्रानुसार राष्ट्रीय सेवा योजनातंर्गत, राज्यसंपर्क अधिकारी, मंत्रालय कक्ष, मुंबई व विभागीय संचालक, नेहरू युवा केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यामाने रासेयो जिल्हा/विभाग समन्वयक व एन.वाय.के. अधिकारी यांच्यासाठी एकदिवसीय राज्यस्तरीय सेमीनारचे आयोजन करण्यात आले आहे. मा.श्री. क्रिडामंत्री पद्माकर वाळवी, मा. श्री. आर.के. गायकवाड, आयुक्त, सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मा. कुलगुरू, भारती विद्यापीठ, पुणे व मा. डॉ. प्रकाश गायकवाड, संचालक उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या उपस्थितीत सदर कार्यक्रमाचे आयोजन होणार आहे.

सदर सेमीनारमध्ये राज्यसंपर्क अधिकारी व संचालक एन.वाय.के. यांच्या कडून रासेयो मार्फत घेण्यात आलेल्या यशस्वी उपक्रमांचा आढावा घेण्यात येणार आहे. त्यानुसार पुणे विद्यापीठ रासेयो महाविद्यालयांमध्ये यशस्वीरीत्या राबविण्यात आलेले नाविण्यपुर्ण उपक्रम व स्वयंसेवकांकरीता राबविण्यात आलेले कौशल्य विकास उपक्रम यांचे सादरीकरण जिल्हा/विभाग समन्वयक यांनी करावयाचे आहे. सदर सेमीनार मध्ये राज्यभरातील विवीध विद्यापीठांमधून २२५ रासेयो कार्यक्रम अधिकारी व एनवायके, अधिकारी उपस्थित राहणार आहे.

तरी सदर राज्यस्तरीय सेमीनार करीता आपल्या महाविद्यालयातील **जिल्हा/विभाग समन्वयक** यांना दि. ३० जूलै २०१३ रोजी, स. १०.३० ते ४ वा. या वेळेत, **कॉन्फरन्स हॉल, यशवंतराव मोहीते महाविद्यालय, एरंडवणा, पौड फाटा जवळ, कोथरूड पुणे ३८** या ठिकाणी उपस्थित राहण्या विषयी कळवावे. सेमीनार रोजीची सदर प्राध्यापकाची कर्तव्य रजा महाविद्यालयाने मंजूर करावी व सदर सेमिनारचा प्रवास खर्च रासेयो नियमित कार्यक्रमातुन करण्यात यावा, हि नम्र विनंती.

**संपर्क : श्री. ए. बी. शिंदे, रासेयो क्षेत्रिय कार्यालय, पुणे – ९४२३२१७३२५**

आपली विश्वासू,
कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना